# सहनिबंधक सहकारी संस्था(सिडको),
# सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालय

रायगड भवन, तिसरा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
दुरध्वनी क्र. ➢ २७५७४५०५Email ➢jointregcidco@gmail.com

जा.क.सनि/सस/सिडको/3204/२०२१ दिनांक: 14 /०७/२०२१

प्रति,
**श्री. अशोक दत्ताराम फाटक, मुख्यप्रवर्तक**
**नियोजित बालाजी आंचल सहकारी गृहनिर्माण संस्था,**
**भूखंड क्र. बी४६, सेक्टर १६,**
**उलवे, नवी मुंबई**

विषय :- **नियोजित बालाजी आंचल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या,** या संस्थेचे नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडणेबाबत.

कृपया आपले लक्ष आपल्या दिनांक ०८/०७/२०२१ रोजीच्या वरील विषयासंबंधीच्या पत्राकडे लक्ष वेधून कळविण्यात येते की, आपल्या नियोजित संस्थेचे नांव **नियोजित बालाजी आंचल सहकारी गृहनिर्माण संस्था, भूखंड क्र. बी/४६ , सेक्टर १६, उलवे, नवी मुंबई** असे राखून ठेवण्यात येत असून आपणास नियोजित संस्थेच्या नावाने खालील नमूद केलेल्या बँकेत खाते उघडण्यासाठी परवानगी खालील अटींवर देण्यात येत आहे.

(१) नांव राखून ठेवल्यापासून तीन महिन्यांचे आत संस्थेचे नोंदणी प्रकरण या कार्यालयास सादर करावे.तसेच सर्व सदनिका/गाळे खरेदी करार भारतीय नोंदणी कायदा १९०८ नुसार नोंदवून व मुद्रांक शुल्क भरलेल्या पावत्यांच्या सत्यप्रती प्रकरणासोबत जोडाव्यात.

(२) राखून ठेवलेले नांव तीन महिन्यांपर्यंत मान्यताप्राप्त राहील. नोंदणी प्रकरण तीन महिन्यांचे आत सादर न केल्यास नियोजित संस्थेचे नांव रद्द समजण्यात येईल.

(३) तीन महिन्यात नोंदणी प्रकरण सादर करणे शक्य नसल्यास संयुक्तीक कारणासह मुदतीत मुदत वाढीसाठी अर्ज करावा.

(४) नियोजित संस्थेच्या नांवे खाते मुख्यप्रवर्तकाच्या सहीने उघडण्यात यावे.

(५) नियोजित संस्थेच्या नांवाने उघडलेल्या खात्यातील रक्कम संस्था नोंदणी झाल्यावर संस्थेच्या नावाने कारभार सुरु होईपर्यंत नोंदणी अधिकाऱ्याच्या पुर्वपरवागनीशिवाय सदरची रक्कम काढण्यात येवू नये.

(६) नियोजित संस्थेचे नांव राखून ठेवून बँकेत खाते उघडण्याची परवानगी दिली म्हणजे संस्था नोंदणी होईलच असे नाही याची नोंद घ्यावी.

(७) नियोजित संस्थेचे नोंदणी प्रस्तावासोबत प्रवर्तक सदस्यांच्या करार नोंदणी पावत्यांच्या दोन्ही बाजूच्या छायांकित प्रती सादर कराव्यात.

(८) नोंदणी प्रकरणासोबत टाईटल सर्टिफिकेट जोडावे/भोगवटा प्रमाणपत्र जोडावे/भोगवटा प्रमाणपत्र नसल्यास संबंधित प्राधिकरणाचा इमारत अधिकृत असलेबाबतचा दाखला जोडावा.

(९) नोंदणी प्रस्ताव सादर करताना मा. सह आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे व महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्देशित केल्यानुसार सर्व कागदपत्र जोडण्यात यावीत.

(१०) मुख्य प्रवर्तकांनी आवश्यक त्या ठिकाणी प्रतिज्ञालेख/प्रतिज्ञापत्र सादर करावीत.

(११) नोंदणी प्रस्तावासोबत सादर केलेल्या कागदपत्रांबाबत मुख्य प्रवर्तक जबाबदार असतील.

KNJadhav
( डॉ. केदारी जाधव )
सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको
नवी मुंबई

सहनिबंधक सहकारी संस्था सिडको नवी मुंबई

प्रत,
दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या, शाखा कळंबोली/कामोठे/तळोजा/नवीन पनवेल/जुना पनवेल, नवी मुंबई
दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्या, शाखा वाशी, नवी मुंबई

सहनिबंधक सहकारी संस्था, सिडको
नवी मुंबई

Scanned with CamScanner